| वर्ष - 7 | अंक - 137 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™ गणेशोत्सव

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 21 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews







# महापालिका ‘दप्तराविना शाळा’!

## » दर शनिवारी उपक्रम : विद्यार्थ्यांना नवीन गोष्टी शिकवणार!

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शैक्षणिक क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सर्व १२८ शाळांमध्ये दर शनिवारी ‘दप्तराविना शाळा’ हा उपक्रम सुरू केला आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या खांद्यावरचा भार हलका झाला असून अभ्यासाव्यतिरिक्त नवनवीन गोष्टी शिकण्याचा उत्साह त्यांच्यामध्ये बळावला आहे.**



आता प्रत्येक शनिवारी महापालिकेच्या शाळांमधील वर्ग जल्लोषाने गजबजून जातात. शनिवार जो शाळेचा दिवस असतो तो आता गीत, कविता, गायन, प्रश्नमंजुषा, शाब्दिक खेळ, पाककला, चित्रकला, मैदानी खेळ अशा विविध उपक्रमांनी भरलेला आहे. ‘दप्तराविना शाळा’ हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा तसेच नवनवीन गोष्टी शिकण्याची आवड निर्माण करणारा आहे.

या उपक्रमामुळे महापालिका शाळा कल्पकतेचे केंद्र बनल्या असून गणेशोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्याच्या कलेत प्रभुत्व मिळवत आहेत आणि यामुळे विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेला तसेच पर्यावरणपूरकतेला या दोन्ही गोष्टींना प्रोत्साहन मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिल्यास त्यांची शाळा उपस्थितीची गोडी वाढेल आणि आठवड्याभराच्या शारिरिक, मानसिक त्रासातून मुक्तता मिळेल.

> “ दप्तराविना शाळा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची कल्पकता तर वाढलीच आहे पण त्यांच्या कौशल्यालाही वाव मिळाला आहे. पालक आणि शिक्षकांनीही या अग्रेसर विचारसरणीचे कौतुक केले आहे. या उपक्रमाने विद्यार्थ्यांना जड दप्तरांच्या शारीरिक ओझ्यापासून मुक्ती तर दिलीच पण त्यांचा मानसिक भारही हलका केला आहे. जिज्ञासा आणि जीवन कौशल्ये यावर भर देऊन महापालिका शाळा खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना शाळेच्या वेशीपलीकडे सतत विकसित होत असलेल्या धावपळीच्या जगात पाऊल ठेवण्यास मदत करत करतील.
>
> – **शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका



‘दप्तराविना शाळा’ उपक्रमाने विद्यार्थ्यांना पारंपरिक अभ्यासक्रमाबाहेरील त्यांच्या आवडी जाणून घेण्याची संधी मिळाली आहे. नृत्य, संगीत, चित्रकला किंवा नाटक यांसारखे कलात्मक उपक्रम विद्यार्थ्यांना त्यांची वेगळी बाजू आत्मसात करण्यासाठी आणि त्यांच्या प्रतिभेला जोपासण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत.

---

# आमदार गोपिचंद पडळकरांच्या गोप्याचा बंदोबस्त करा!

## » शेखर काटे : पिंपरीत राष्ट्रवादीचे आंदोलन

**। पिंपरी ।महाईन्यूज ।**

**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते मा.श्री.अजितदादा पवार यांच्याबाबत संतापजनक वक्तव्य केल्याबद्दल विधान परिषदेचे आमदार गोपिचंद पडळकर याचा जाहीर निषेध करण्यात आला. पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी येथे राष्ट्रवादी कॉंग्रेसच पक्षाचे शहराध्यक्ष श्री. अजितभाऊ गव्हाणे यांच्या नेतृत्त्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी महिला अध्यक्षा प्रा. कविताताई आल्हाट, युवक सेलसह सर्व सेलचे पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**




### आंदोलनास यांची उपस्थिती...

**» यावेळी माजी नगरसेविका संगिता ताम्हाणे, शमीम पठाण, माया बारणे, माजी नगरसेवक संजय नेवाळे, राजू बनसोडे, मुख्य संघटक अरुण बो-हाडे, युवती अध्यक्ष वर्षा जगताप, युवक प्रदेश उपाध्यक्ष विशाल वाकडकर, युवक प्रदेश सरचिटणीस विशाल काळभोर, चिंचवड विधानसभा संघटक सतीश दरेकर, शहर प्रवक्ते विनायक रणसुभे, भोसरी विधानसभा संघटक प्रकाश सोमवंशी, भोसरी विधानसभा अध्यक्ष पंकज भालेकर, युवक कार्याध्यक्ष प्रसाद कोलते, तुषार ताम्हाणे, प्रसन्ना डांगे आदी उपस्थित होते.**

“गोप्या नावाचा कुत्रा... काही लोकांनी महाराष्ट्राच्या राजकारणात सोडला आहे. तो कुणावरही आक्षेपार्ह बोलत असतो.

गेल्या विधानसभा निवडणुकीत त्याचे डिपॉडिट जप्त झाले होते. आता त्याला नेत्यांच्या इशाऱ्यावर भूंकल्याशिवाय चालणार नाही. पण, गोप्या जो बोलत आहे. ते त्यांच्या नेत्यांना मान्य आहे का? असा खरा प्रश्न आहे,” अशा परखड शब्दांत माझी भूमिका मांडली.

राजकीय, सामाजिक जीवनात पडळकरने सभ्यता ठेवावी, अन्यथा आम्ही त्यांचा इतिहास महाराष्ट्रा समोर मांडू, असा इशाराही यानिमित्ताने दिला आहे.

# पुण्यात महामेट्रो मार्गांचा तिढा!

## पीएमआरडीए, महामेट्रोची समान मार्गांकडे धाव

| पुणे | महाईन्यूज |
प्रतिनिधी|

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) आणि महामेट्रो यांच्याकडून दोन समान मार्गांवर मेट्रो उभारणीचे प्रकल्प विकास आराखडे सादर करण्यात आले आहेत. त्यामुळे एकच संस्था या मार्गांचे काम करेल हे निश्चित करण्यात आले.**



आता हे मार्ग फायदेशीर ठरतील की नाही, हे तपासण्यासाठी पीएमआरडीएने सल्लागार नेमण्याचे पाऊल उचलले आहे. सल्लागारांचा अहवाल आल्यानंतर या मार्गांवर मेट्रो उभारणी कोण करणार, याचा निर्णय घेतला जाणार आहे. पीएमआरडीएचे शिवाजीनगर ते लोणीकाळभोर आणि स्वारगेट ते सासवड या मार्गांचे प्रस्ताव आहेत. पीएमआरडीएने या मार्गांचा प्रकल्प विकास आराखडा दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून तयार करून घेतला होता. याचवेळी महामेट्रोचा खडकवासला ते खराडी हा मार्ग प्रस्तावित आहे. त्यात खडकवासला ते स्वारगेट, स्वारगेट ते हडपसर, हडपसर ते खराडी आणि हडपसर ते लोणी काळभोर या टप्प्यांचा समावेश आहे. महामेट्रोने या मार्गाचा प्रकल्प विकास आराखडा खासगी सल्लागार संस्थेकडून तयार करून घेतला होता. दोन्ही संस्थांनी महापालिकेकडे हे प्रकल्प विकास आराखडे सादर केले होते. पीएमआरडीए आणि महामेट्रोचे प्रस्तावित मेट्रो मार्ग स्वारगेट-पूलगेट-हडपसरपर्यंत समान आहेत. पुढे दोन्ही मार्ग लोणी काळभोरपर्यंत जात आहेत. त्यामुळे जवळपास समान मार्गांवर दोन्ही संस्थांनी आराखडे तयार केले आहेत. पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरणाच्या (पुमटा) बैठकीत विभागीय आयुक्तांनी एकत्र येत असलेल्या मार्गांवर एकाच संस्थेने काम करावे, असे निर्देश दिले होते. हा प्रकल्प सार्वजनिक खासगी भागीदारीतून (पीपीपी) करण्यासाठी सल्लागार नेमण्याची सूचना त्यांनी पीएमआरडीएला केली होती. त्यानुसार, या मार्गांची आर्थिक व्यवहार्यता तपासण्यासाठी सल्लागार नेमण्याची पावले पीएमआरडीएने उचलली आहेत. यात त्या मेट्रो मार्गांच्या उत्पन्नासोबत इतर माध्यमातून मिळू शकणारा महसूलही पाहिला जाणार आहे.

> महामेट्रो आणि पीएमआरडीए यांच्याकडून दोन समान मेट्रो मार्गांचे प्रकल्प विकास आराखडे तयार करण्यात आले होते. पुमटाच्या बैठकीत एकच संस्था हे काम करेल, हे निश्चित करण्यात आले. आर्थिक व्यवहार्यता तपासून पीएमआरडीए हे काम करण्याचा निर्णय घेईल. त्यांनी हे काम न केल्यास महामेट्रो ते करेल.
>
> **-अतुल गाडगीळ,** संचालक (कार्य), महामेट्रो

> महामेट्रोने स्वारगेट ते पूलगेटपर्यंत मेट्रो मार्गाचे काम करावे आणि रामवाडीपासून पुढे मगरपट्ट्यापर्यंत मेट्रो मार्गाचा विस्तार करावा, असा प्रस्ताव आहे. तिथून पुढे पीएमआरडीएला लोणी काळभोर आणि सासवडपर्यंत मेट्रो मार्गांचे काम करता येऊ शकते. सल्लागार नेमून या मार्गांची आर्थिक व्यवहार्यता तपासण्यात येणार आहे. त्यानंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल.
>
> **-रिनाज पठाण,** अधीक्षक अभियंता, पीएमआरडीए

## काम करण्यास पालिकेच्या कर्मचाऱ्यांची टाळाटाळ !

| पुणे | महाईन्यूज |
प्रतिनिधी|

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महापालिकेकडील एक हजार मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले आहे. मात्र निवडणुकीचे कामकाज असल्याचे कारण पुढे करत महापालिकेचे कामकाज करण्यास या कर्मचाऱ्यांकडून टाळाटाळ होत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी मूळ जबाबदारी सांभाळून निवडणूक आयोगाचे कामकाज करावे, असे परिपत्रक अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी काढले आहे.

जिल्हा निवडणूक कार्यालयाकडून आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीची तयारी केली जात आहे. त्यासाठी महापालिकेसह अन्य शासकीय यंत्रणातील कर्मचारी वर्गाची नियुक्ती करण्यात आली आहे. महापालिकेतील कर्मचाऱ्यांना शहरातील सहा विधानसभा मतदारसंघनिहाय मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या



जबाबदारीचे वाटप करण्यात आले आहे. यात महापालिकेचे सुमारे एक हजार कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. निवडणूक विभागाचे काम महापालिकेच्या कामकाजाची मूळ जबाबदारी सांभाळून करणे अपेक्षित आहे. मात्र, निवडणूक विभागाचे काम असल्याचे सांगून महापालिकेच्या कामकाजाकडे कर्मचारी दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे पालिकेच्या कामकाजावर त्याचा परिणाम होत असून कामे रखडत आहे. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी हा आदेश काढला आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे बिनवडे यांनी या आदेशात नमूद केले आहे.

## गायत्री स्कूलमध्ये गणपती बाप्पा विराजमान!

### ढोल ताशांच्या गजरात गणरायाचे आगमन

**चित्रकला उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

| पुणे | महाईन्यूज |
प्रतिनिधी|

**शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना सण, उत्सव आणि भारतीय संस्कृतीची माहिती व्हावी. या करिता गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलच्या माध्यमातून प्रत्येक सण-उत्सव अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. प्रतिवर्षीप्रमाणे गणपती बाप्पा स्कूलमध्ये विराजमान झाले आहेत.**



गायत्री इंग्लिश मिडियम स्कुल मधे गणरायाचे मोठ्या उत्साहात, आनंदात, भक्तिमय वातावरणात आगमन झाले. ढोलताशांचा निनाद ऐकायला मिळाला. शाळेतील विद्यार्थी, सर्व विभागाचे मुख्याध्यापक व शिक्षक यांनी हजेरी लावली होती. या निमित्ताने गणपती बनवण्याचा उपक्रम , चित्र स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.

तसेच, सुंदर व सुबक आरास उभारण्यासाठी विद्यार्थी व कला शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. आरती, महाप्रसाद करुन स्वागत करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव संजय भोंगाळे यांनी गणेशोत्सवाच्या निमित्त सर्व विद्यार्थी, पालक आणि शिक्षक-कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनायक भोंगाळे म्हणाले की, भाद्रपद मासात तुम्हा-आम्हा सर्वांच्या लाडक्या गणरायाचं आगमन होत असले तरी त्याच्या आगमनाची सर्वजण आतुरतेने आधीपासूनच वाट पाहत असतात. घरगुती गणपती असो की सार्वजनिक, सर्वजण एकजुटीने त्याच्या स्वागताची जय्यत तयारी करतात. त्यामुळे घरीदारी आनंदाचं, उत्साहाचं, प्रेमाचं वातावरण आपोआप तयार होतं आणि त्यामुळे सर्वजण एकत्र येतात. गाठीभेटी होतात, ऋणानुबंध निर्माण होतात. परिणामी, सर्वत्र सकारात्मक ऊर्जा अनुभवता येते. आपल्या सण-उत्सवांचे हे वैशिष्ट्य आहे की, त्या निमित्ताने मने जुळावीत, नाती दृढ व्हावीत आणि भेदभाव गळून पडावेत. अशी व्यापक विचारधारा असते.



# भगवंताशी समर्पित जीवन जगा!

## पंडित प्रदीप मिश्रा यांचा संदेश : भर पावसात भाविकांचा लाखोंच्या संख्येने सहभाग


। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**“जीवनात सुख-दुःख हा खेळ सुरूच राहणार आहे. व्यापारात कधी नुकसान, तर कधी फायदा हे ठरलेले आहे. पण, “तेरी मंदिर मे आना मेरा काम है...और मेरी बिघडी बनाना तेरा काम है...” या भावनेतून भगवंतावर विश्वास ठेवून जीवन कार्य केले पाहिजे. आपण दुसऱ्यांसोबत ज्या प्रसन्नतेने वागतो. तसेच, आपल्या कुटुंबियांशीसुद्धा वागावे. आपल्या घरात प्रसन्नता असावी. आपले जीवन भगवंताच्या विचारांशी समर्पित ठेवा, असा संदेश आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिव महापुराण कथावाचक पंडित प्रदीपजी मिश्रा यांनी दिला.**

लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवाराच्या वतीने सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर ‘श्री अष्टविनायक शिवमहापुराण कथे’चे आयोजन करण्यात आले आहे. भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप या कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक आहेत.

या सोहळ्यात आजच्या सहाव्या दिवशी मावळ भाजपा प्रभारी, आमदार प्रशांत ठाकूर, लोकसभा महाराष्ट्र प्रभारी माजी मंत्री बाळासाहेब भेगडे, आमदार अण्णा बनसोडे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, हभप पुरुषोत्तम महाराज पाटील, हभप शंकर महाराज शेवाळे चैतन्य महाराज वाडेकर, ज्येष्ठ गायक राजेश सरकटे, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विनोद बन्सल, महेश्वर मराठे, दादा विधाते, विश्व हिंदू परिषदेचे अखिल भारतीय सत्संग प्रमुख दादा वेदक, राष्ट्रवादीचे पुणे अध्यक्ष दीपक मानकर, ज्येष्ठ नेते हनुमंतराव गावडे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, शरद बुट्टे पाटील, अविनाश कोळी, बँक संघटनेचे अध्यक्ष सुभाष मोहिते, भाजपा महिला मोर्चा शहर अध्यक्षा सुजाता पालांडे, स्थायी समिती माजी अध्यक्ष नितीन लांडगे,अमित गोरखे,, संतोष लांडगे, सागर भोसले, सूर्यकांत गोफणे,अमित गावडे, विश्व हिंदू परिषदेचे नितीन वाडकर, दत्तोबा लांडगे, राजाभाऊ गोलांडे, कैलास जगताप, भरतशेठ लांडगे, राजेश लांडगे, श्रीकृष्ण वर्मा, अरुण देशमुख,आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कथा श्रवणाचा आनंद घेतला.

यावेळी पिंपरी-चिंचवड कुस्तीगीर संघाच्या वतीने हनुमंत गावडे, आमदार प्रशांत ठाकूर, माजी मंत्री बाळासाहेब भेगडे यांच्यावतीने शाल व गदा देवून कथा सोहळ्याचे मुख्य निमंत्रक शंकर जगताप यांना सन्मानित करण्यात आले.





### पंडित प्रदीप मिश्रा यांनी सांगितले रुद्राक्षाचे महत्व...

कथेमध्ये बोलताना पं. प्रदीप मिश्रा यांनी आज रुद्राक्षाचे महत्व विषद केले. रुदाक्ष हे फळ असले तरी अनेक गुणकारी आहे. रुद्राक्ष जर तुमच्या शरीराला सातत्याने स्पर्श करत असेल तर यकृत, किडनी, थायरॉईड, कर्करोगासारख्या आजारापासून तुम्हाला संरक्षण मिळेल. अनेकदा रुद्राक्ष संबंधी अनेक गैरसमज पसरविण्यात आले आहेत. तुम्ही कोणत्याही आभूषणाच्या बरोबरीने रुद्राक्ष घातला तरी चालू शकेल, असे मिश्रा यांनी बोलताना सांगितले.

### अयोध्या ही आपली सांस्कृतिक राजधानी...

अयोध्येत राम मंदिराची स्थापना व्हावी, ही आपल्या सगळ्यांचीच इच्छा होती. अनेक वर्षांपासून यासाठी लढा सुरु होता. अनेक कारसेवकांनी यासाठी बलिदानदेखील दिले. त्यानंतर आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रभू श्रीराम मंदिराचे सर्व अडथळे दूर केले आणि भव्य श्रीराम मंदिराच्या निर्माणाला सुरुवात झाली आहे. आगामी काळात आयोध्या ही आपली सांस्कृतिक राजधानी होणार आहे. यासाठी मकर संक्रांतीनंतर आपण सर्वजण रामाच्या दर्शनासाठी जाणार आहोत. विश्व हिंदू परिषदेच्या स्थापनेला ६० वर्ष पूर्ण होत आहेत, त्या निमित्ताने राममंदिर दर्शनाला येण्याचे निमंत्रण देण्यासाठी आलो असल्याचे विश्व हिंदू परिषदेचे अखिल भारतीय सत्संग प्रमुख दादा वेदक यांनी यावेळी बोलताना सांगितले.

### भर पावसात भाविक सभामंडपाच्या बाहेर बसून...

» गेल्या सहा दिवसापासून पं. प्रदीप मिश्रा यांच्या श्री अष्टविनायक शिव महापुराण कथेचे आयोजन सांगवी येथे केले आहे. लाखोच्या संख्येने भाविक ही कथा ऐकण्यासाठी सभामंडपात येत आहे. भाविकांच्या ओघामुळे तीनही सभामंडप भाविकांच्या गर्दीने भरून जात आहेत. आज सहाव्या देखील अशीच स्थिती होती. यावेळी पावसाचे आगमन झाले. मात्र, भर पावसातही भाविक आपल्या जागेवर ठिय्या मांडून बसले होते. गणेशोत्सव आणि भर पावसात भाविकांचा उत्साह आणि उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल निमंत्रक शंकर जगताप यांनी जाहीरपणे आभार मानले.

### उद्या शिव महापुराण कथेचा समारोप

» गेल्या सहा दिवसांपासून सुरु असलेल्या श्री अष्टविनायक शिवमहापुराण कथेचा उद्या (दि. २१ सप्टेंबर) समारोप होणार आहे. गेल्या सहा दिवसांपासून पीडब्ल्यूडी मैदानावर या कथेचे आयोजन करण्यात आले होते. उद्या या कथा सोहळ्याचा समारोप होणार आहे. समारोपाची कथा सकाळी ८ ते ११ या वेळेत होणार आहे. सर्व भाविकांनी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष व कथा सोहळ्याचे मुख्य निमंत्रक शंकर जगताप यांनी केले आहे.



# भूमिका

# अल्पसंख्याक समाजाची भीती वाटते

**आपल्या देशातील अल्पसंख्याक समाजाला बहुसंख्याकांसोबत राहताना असुरक्षित वाटतं आणि बहुसंख्याक समाजाला अल्पसंख्याक समाजाची भीती वाटते. हे किती रोगट सामाजिक वातावरण आहे! अलीकडे आलेला एक अनुभव. बहीण तिच्या मित्र-मैत्रिणींसोबत रोड ट्रिपला चालली होती. प्रवास रात्रीचा होता.**

तिचे मित्रमैत्रीण तिला पिकअप करण्यासाठी गाडी घेऊन आमच्या मुस्लीम वस्तीत पोहोचले. रात्रीचे साडेअकरा वाजले होते. नेमकी त्याच वेळेस आमच्या सोसायटीच्या आवारात पुरुषांची गर्दी झाली. इतके सारे पांढरे कुर्ते आणि पांढऱ्या टोप्या पाहून त्या गाडीतला एक मित्र अनकम्फर्टेबल होऊ लागला. तो चिंताग्रस्त होत विचारू लागला की, “हे एवढे लोक या वेळेला जमून काय करतायत? हे रोज गोळा होतात का?” त्याच्या मनातल्या असंख्य शंका त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत्या. कुठलीही गर्दी दिसल्यावर मनात प्रश्न उभं राहणं स्वाभाविक होतं. बहिणीने त्याला सोसायटीत एकाचा मृत्यू झाल्यामुळे गर्दी जमली असल्याची माहिती दिली. त्याचं त्या उत्तरानं समाधान झालं नाही. तो नाना चिंता व्यक्त करत राहिला. “मी जर एकटा त्यांच्या तावडीत सापडलो, तर ते मला मारतील का?” असा असंबद्ध प्रश्नही त्याने केला. तो त्या वेळेस मुस्लीम वस्तीतल्या



गर्दीत स्वत:च्या तीनेक मित्रांसोबत होता. स्थिती पाहता तो त्या क्षणी अल्पसंख्याक होता आणि ती गोष्ट त्याला प्रचंड एकटेपणा देत होती.

अल्पसंख्याक व्यक्तीला लिंग, जात, धर्म, वर्ग किंवा वर्ण अशा कुठल्याही प्रकारच्या बहुसंख्याकांमध्ये काही काळापुरती भीती वाटणं, असुरक्षिततेची जाणीव होणं किंवा नुसतंच असहज होणं हे किंचित नैसर्गिक आहे. मात्र त्यांना दीर्घकाळ तसं वाटत असेल तर ती बहुसंख्य वर्गाची मानहानी ठरते. मात्र आपल्याकडे चित्रच उलटं आहे. जिथं ‘हिंदू खतरे में है’ असं म्हणत बहुसंख्याक हिंदू समाजालाच भयभीत आणि असुरक्षित असल्याची जाहीर वाच्यता करावी लागते, वाहनांवर ‘गर्व से कहो हम हिंदू है’ असं स्वत:चं हिंदू असणं ठळक करून सांगावं लागतं, अशा आपल्या समाजात अल्पसंख्याकांची मानसिक अवस्था काय असेल? जिथं बहुसंख्याक समाज मोठ्या संख्येत असूनही स्वत: घाबरलेला आहे, तिथं अल्पसंख्याक समाजाला भीती वाटणं ओघानं आलंच. घरात मोठ्या भावंडाला बेचैन वाटत असेल, तर लहान भावंडालाही तेच जाणवणार. कारण घरातलं एकूण वातावरणच नॉर्मल नाहीये. अशा घरात आश्वस्त कसं वाटणार? आपल्या सामाजिक सहजीवनात परस्पर भरवसा आणि इमान घटत आहे का? बऱ्याचदा फुटीरतावादी मंडळी ‘देशाची लोकसंख्या मुस्लिमांमुळे वाढत आहे. ते आपल्या देशाचं इस्लामी राष्ट्र करतील. याविरुद्ध आपण वेळीच जागं व्हायला पाहिजे.’ अशी हाक देत बहुसंख्याकांच्या भीतीत भर घालतात. आश्चर्य म्हणजे आपला देश ‘इस्लामी राष्ट्र’ होऊ नये म्हणून धडपडणाऱ्या मंडळींना देशाचं ‘हिंदूराष्ट्र’ होणं चालणार आहे. (तसंही, ते आज या देशात असं काय करू शकत नाहीत, जे त्या ‘हिंदूराष्ट्रात’ करणार आहेत?) स्वत:च्या वागण्यातील या विरोधाभासाची त्यांना ना जाणीव असते, ना अपराधगंड. किंबहुना; ही मंडळी स्वत:च्या अजेंड्यासाठी सत्य दडवून खोटी आणि चुकीची माहिती संघटितपणे संक्रमित करतात. आता हेच पाहा, बहुसंख्याकांच्या कुटुंबात दोन अपत्ये अन् मुस्लिमांच्या कुटुंबात आठ अपत्ये असा समज सर्रास दिसून येतो. मात्र ते मिथक आहे. निवडणूक आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. एस. वाय. कुरेशी यांनी त्यांच्या ‘पॉप्युलेशन मिथ’ या पुस्तकात मुस्लीम लोकसंख्येबद्दलच्या या धास्तीचा सखोल परामर्श घेतला आहे. त्यांनी या पुस्तकात गेल्या चार दशकांतील जनगणनेचा, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणांचा अभ्यास केला आहे. मुस्लीम आणि हिंदूंच्या अपत्यसंख्येतील फरक १९५१ मध्ये निव्वळ १.१ इतका होता आणि तोच फरक २०११ च्या जनगणनेनुसार ०.४८ इतका आहे. सोप्या पद्धतीने सांगायचं तर १९५१ मध्ये हिंदू कुटुंबात जर तीन मुलं असतील तर समकालीन मुस्लीम कुटुंबात चार अपत्ये असणार. आता तो फरक त्याहूनही निम्म्यावर आला आहे. अलीकडे मुस्लीम समुदायात कुटुंब नियोजनाच्या पद्धतींचा मोठ्या प्रमाणात स्वीकार होत असल्याचा अभ्यासही पुस्तकात नमूद आहे. देशातील मुस्लिमांची लोकसंख्या १९५१ च्या जनगणनेनुसार ९.८ टक्के होती. ती २०११ ला १४.२ टक्के झाली. मुस्लिमांच्या लोकसंख्येत ४.२ टक्क्यांनी वाढ झालेली दिसत असली, तरी हा वेग गेल्या ६० वर्षांतील आहे, हेदेखील लक्षात घ्यायला हवं. ही संख्या मुस्लिमांना आजही अल्पसंख्याकच ठरवते.

## संपादकीय »

# घोषणांच्या देशा..

***विकासाच्या समतोलासाठी केवळ अधिक रकमेच्या ‘पॅकेज’ची घोषणा करून फारसे काही हाती लागत नाही, याचा अनुभव मराठवाड्यातील जनतेने आजवर घेतला आहे.***

मराठवाड्याच्या विकासाला गती देण्यासाठी सात वर्षांपूर्वी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जाहीर केलेल्या सुमारे ४९ हजार कोटी रुपयांच्या घोषणांचे नेमके काय झाले, या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर मिळण्यापूर्वीच, गेल्या आठवड्यात छत्रपती संभाजीनगरमध्ये झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पुन्हा एकदा घोषणांचा वर्षांव करण्यात आला. या वेळी ४६ हजार ५७९ कोटी रुपयांची तरतूद करणाऱ्या योजनांना गती देण्यात येईल, असे सांगितले गेले.

गतिमान विकासासाठी मूलभूत सोयीसुविधा निर्माण करणे अत्यावश्यक असते, हे खरे, परंतु राज्यातील प्रशासनाची विकासकामांची गती पाहता, या अशा थोर घोषणा बहुतेक करून कागदावरच राहतात, असा आजवरचा अनुभव आहे. मराठवाड्यातील सर्वात मोठा प्रश्न पाण्याचा.

**समतोल प्रादेशिक विकास होतो की नाही हे बघण्यासाठी आवश्यक असलेली राज्यातील तीन वैधानिक विकास मंडळे गेली तीन वर्षे झाली तरी अजून कागदावरच आहेत. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राच्या विकासावर लक्ष ठेवणारी ही मंडळे हवीत की नकोत हा वादाचा एक मुद्दा झाला. मात्र निधीचे समान वाटप व अनुशेषाची अद्ययावत माहिती मिळण्यासाठी तरी या मंडळाचे गठन गरजेचे.**

# तीन वैधानिक विकास मंडळे कागदावरच

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना २० एप्रिल २०२० ला या मंडळांची मुदत संपली. नियमाप्रमाणे त्यांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव तेव्हा तातडीने केंद्राकडे पाठवणे आवश्यक होते, पण आघाडी सरकारने त्यात चालढकल केली. प्रस्ताव संमत केला तर त्यावर राज्यपाल व केंद्र सरकार त्यांच्या मर्जीतील लोकांच्या नेमणुका करतील ही भीती यामागे होती. नेमका हाच मुद्दा वगळून तेव्हा विरोधात असलेल्या भाजपने आघाडी सरकारविरुद्ध रान उठवले. मागास भागांच्या हितासाठी ही मंडळे हवीतच असे तेव्हा या पक्षाचे म्हणणे. आता हाच पक्ष सत्तेत येऊन वर्ष उलटले तरी या मंडळाचे नव्याने गठन झाले नाही. सध्याच्या सरकारने गेल्या वर्षी २२ ऑक्टोबरला मुदतवाढीचा प्रस्ताव केंद्रीय गृहमंत्रालयाकडे पाठवला. आता वर्ष झाले तरी त्याचे काय झाले हे कुणीही स्पष्टपणे सांगायला तयार नाही. याच काळात भाजपने राज्यातील शहरांच्या नामांतराचे प्रस्ताव तातडीने



केंद्राकडून मंजूर करून आणले. मात्र मंडळाच्या मुदतवाढीसाठी पाठपुरावा करताना सत्ताधारी दिसले नाहीत. विकासापेक्षा अस्मितेचे राजकारण किती महत्त्वाचे हेच यातून दिसते.

घटनेच्या कलम ३७१ (२) अन्वये स्थापन होणारी ही मंडळे अस्तित्वात आली की राज्यपालांना सरकारला प्रश्न विचारण्याचा अधिकार मिळतो. वार्षिक योजनेतील निधी विदर्भ (२३.०३ टक्के), मराठवाडा (१८.७५) तर उर्वरित महाराष्ट्र (५८.२३) यांना दिला की नाही, नाही दिला तर नेमकी अडचण काय होती, असे प्रश्न राज्यपाल विचारू शकतात. नेमके तेच राज्यकर्त्यांना नको असते हा या संदर्भातला वर्षांनुवर्षे येणारा अनुभव. त्यासाठी ही मंडळाची ब्याद नको असाच साऱ्यांचा सूर असतो. तो या मागास भागांवर निश्चितच अन्याय करणारा. या भागांसाठी राखीव असलेला निधी अन्यत्र वळवला जाऊ नये अशी भूमिका सातत्याने घेणाऱ्या भाजपने गेल्या वर्षभरापासून यावर साधलेली चुप्पी अनाकलनीय म्हणावी अशीच. मंडळे अस्तित्वात नसली तरी मागास भागांना ठरवलेल्या सूत्रापेक्षा अधिक निधी देण्यात आला हा प्रत्येक सरकारचा युक्तिवाद. तो एकदाचा मान्य केला तरी मंडळाची गरज उरतेच. याचे एकमेव कारण म्हणजे या मंडळावरील तज्ज्ञांकडून मागास भागांचा होणारा अभ्यास व त्यातून समोर येणारी अन्यायाची आकडेवारी. अपयश दाखवणारे हे मुद्दे कोणत्याही सरकारला नको असतात. मग ते आघाडीचे असो वा युतीचे. त्यामुळेच या मंडळाचे पुनर्गठन रखडलेले आहे. उल्लेखनीय म्हणजे आघाडी सरकारच्या शेवटच्या मंत्रिमंडळ बैठकीत हा मुदतवाढीचा प्रस्ताव संमत करणारे विरोधक आता या मुद्द्यावरून युतीला साधा प्रश्नसुद्धा विचारताना दिसत नाहीत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 'बहिणीचे कल्याण बघतील असे भाऊ प्रत्येक घरात असतातच असे नाही'!

## » आरक्षणावर संसदेत चर्चा करताना सुप्रिया सुळेंचे वक्तव्य

**। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**ऐतिहासिक असे महिला आरक्षण विधेयक आज लोकसभेत बहुमताने मंजूर झाले. मात्र, त्यापूर्वी जवळपास 60 खासदारांनी या विधेयकावर आपले मत मांडले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही या विधेयकावर आपली मते मांडताना भाजपवर टीकास्त्र सोडले.**

मात्र, यादरम्यान त्यांनी केलेल्या एका वक्तव्याची चांगलीच चर्चा होत आहे. 'प्रत्येक बहिणीचे नशिब एवढे चांगले नसते की तिला आपले कल्याण बघणारा भाऊ मिळेल', असे वक्तव्य सुप्रिया सुळे यांनी केले. सुप्रिया सुळेंच्या या वक्तव्याचा संदर्भ आता अजितदादांच्या बंडाशी लावला जात आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले. मात्र, त्यापूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा लोकसभेत म्हणाले होते की, मणिपूरमधील कुकी महिलांच्या भल्यासाठी केवळ महिलांनीच बोलावं असे नाही. पुरुषही बोलू शकतात. आम्ही भाऊ म्हणून बोलू शकतो. याचा संदर्भ देत सुप्रिया सुळेंनी शहांना चांगलाच टोला लगावला. सुप्रिया सुळे म्हणाल्या, प्रत्येक घरात असे भाऊ असतातच असे नाही की जे बहिणीचे कल्याण बघतील. प्रत्येकाचे नशीब एवढे चांगले नसते. चंद्रकांत पाटील यांचे नाव न घेता सुप्रिया सुळे म्हणाल्या,




भाजपच्या एकेकाळी प्रदेशाध्यक्ष असलेल्या नेत्याने मला ऑन कॅमेऱ्यावर घरी जाऊन जेवण बनवण्यास सांगितले होते. ही भाजपची प्रवृत्ती आहे. दुसऱ्या एका मंत्र्याने माझ्याबद्दल ऑन कॅमेरा अपशब्द वापरले. त्यामुळे भाजपने उत्तरे दिली पाहिजेत. तुमचे मंत्री वैयक्तिक टिप्पणी लोकांमधून निवडून आलेल्या महिलेबद्दल बोलतात. मी त्याच्यावर प्रतिक्रिया देखील दिली नव्हती, ती द्यायचीदेखील गरज नव्हती. जनगणना आणि मतदारसंघ फेररचना झाल्यानंतर हे आरक्षण लागू होणार आहे तर संसदेच्या विशेष अधिवेशनाची गडबड का करण्यात आली. या दोन्ही गोष्टी कधी होतील माहिती नाही तर आरक्षण कधी लागू होणार असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला. सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या, देशातील सर्व वृत्तपत्रांनी महिला आरक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्व सरकारांबद्दल लिहिले आहे. महाराष्ट्रात मराठा आरक्षण, धनगर आरक्षण, लिंगायत आरक्षण, मुस्लीम आरक्षण हे प्रश्न देखील महत्त्वाचे आहेत, त्यावरदेखील संसदेत चर्चा व्हावी. कांदा, दुष्काळ असे प्रश्नदेखील महत्त्वाचे आहेत, त्यावरदेखील चर्चा व्हावी. सुप्रिया सुळे म्हणाल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला मतदानाचा अधिकार दिला. महात्मा फुले यांनी आम्हाला शिक्षणाचा अधिकार दिला. महिला धोरणाची सुरुवात राजीव गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेसनं केली. माझे वडील शरद पवार यांनी 33 टक्के महिला आरक्षण पंचायत राजमध्ये लागू ते महाराष्ट्र राज्य होते, याचा अभिमान वाटतो. महिला आरक्षण विधेयकातून एससी, एसटी आणि ओबीसी महिलांसाठीदेखील आरक्षण द्यावे, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली.

### अमित शहांना टोला

» खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले. मात्र, त्यापूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा लोकसभेत म्हणाले होते की, मणिपूरमधील कुकी महिलांच्या भल्यासाठी केवळ महिलांनीच बोलावं असे नाही. पुरुषही बोलू शकतात. आम्ही भाऊ म्हणून बोलू शकतो. याचा संदर्भ देत सुप्रिया सुळेंनी शहांना चांगलाच टोला लगावला. सुप्रिया सुळे म्हणाल्या, प्रत्येक घरात असे भाऊ असतातच असे नाही की जे बहिणीचे कल्याण बघतील. प्रत्येकाचे नशीब एवढे चांगले नसते.

# काँग्रेसचा ओबीसींमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न!

## » काँग्रेसचे दोन समाजामध्ये भांडणे लावण्याचे काम : बावनकुळे

**। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मराठा समाजाला आरक्षण देताना ते वेगळ्या प्रवर्गातून देण्याची सरकारची भूमिका असल्यामुळे ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही. राज्य सरकारच्या वतीने देखील हे आधीच स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतर काँग्रेसचे नेते जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम करत असल्याचा आरोप भाजपचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.**

त्यामुळे मराठा व ओबीसी समाजाचा काँग्रेसवर विश्वास राहिलेला नसल्याची टीका देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. ओबीसी महासंघाने आंदोलन आणि मोर्चा काढला. या मोर्चात भाजपचेच नाही तर सर्वच पक्षाचे नेते होते. ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, हे सर्वपक्षीय बैठकीमध्येच ठरले आहे.

राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने देखील त्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ओबीसी आंदोलनाला सर्व पक्षाच्या नेत्यांनी समर्थन केले आहे. मराठा समाजाला आरक्षण दिले जाईल, मात्र त्यात ओबीसीचे आरक्षण कमी होणार नसल्याचा दावा देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला



आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले नेहमीच जनतेची दीशाभूल करत असल्याचा आरोप चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. वास्तविक काँग्रेस विकासाच्या कामावर चर्चा करण्यापेक्षा दोन समाजामध्ये भांडणे लावण्याचे काम करत असल्याची टीका देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. महिलांच्या संदर्भात संसदेत सादर करण्यात आलेल्या आरक्षण विधेयकाबाबत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतूक केले. महिला आरक्षणासाठी काँग्रेसने कधीच प्रयत्न केला नसल्याचा आरोप चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. आता महिला आरक्षणाबाबत विधेयक मांडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवा इतिहास घडविला असल्याचा दावा चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. देशातील निम्म्या संख्येत असलेल्या महिलांना 33 टक्के आरक्षण मिळेल व त्या देखील देशाच्या जडण-घडणीत हातभार लावतील, असा विश्वास चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे.

### काँग्रेस जनतेची दीशाभूल करते


» ओबीसी महासंघाने आंदोलन आणि मोर्चा काढला. या मोर्चात भाजपचेच नाही तर सर्वच पक्षाचे नेते होते. ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, हे सर्वपक्षीय बैठकीमध्येच ठरले आहे. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने देखील त्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ओबीसी आंदोलनाला सर्व पक्षाच्या नेत्यांनी समर्थन केले आहे. मराठा समाजाला आरक्षण दिले जाईल, मात्र त्यात ओबीसीचे आरक्षण कमी होणार नसल्याचा दावा देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले नेहमीच जनतेची दीशाभूल करत असल्याचा आरोप चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. वास्तविक काँग्रेस विकासाच्या कामावर चर्चा करण्यापेक्षा दोन समाजामध्ये भांडणे लावण्याचे काम करत असल्याची टीका देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

# महिला आरक्षण विधेयक बहुमताने मंजूर!

## » विधेयकात ओबीसी महिलांनाही आरक्षण हवे : राहुल गांधी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**आज संसदेच्या विशेष अधिवेशनात लोकसभेत महिला आरक्षण विधेयक (नारी शक्ती वंदन विधेयक) बहुमताने मंजूर झाले आहे. 454 खासदारांनी विधेयकाच्या समर्थनार्थ मतदान केले. तर, केवळ दोघांनी विधेयकाविरोधात मतदान केले. आता उद्या गुरुवारी हे विधेयक मंजुरीसाठी राज्यसभेत सादर केले जाईल. राज्यसभेत हे विधेयक पास झाल्यास नंतर ते अंतिम मंजुरीसाठी राष्ट्रपतींकडे जाईल. राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर विधेयकाचे कायद्यात रुपांतर होईल.**

दरम्यान, आज विधेयकावरील चर्चेत 60 खासदारांनी सहभाग घेतला. यावेळी विरोधकांना उत्तर देताना अमित शाह म्हणाले, मी येथे 128 व्या घटनादुरुस्तीबाबत बोलण्यासाठी उभा आहे. ते बोलू लागताच विरोधकांनी गदारोळ सुरू केला. यावर शाह हसले आणि राहुल गांधींची नक्कल करत.. डरो मत.. डरो मत.. असे म्हणू लागले.

शाह म्हणाले- महिला आरक्षण विधेयक हे युग बदलणारे विधेयक आहे. भारतीय संसदेच्या इतिहासात उद्याचा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. काल गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर नवीन सभागृहात प्रथमच उदघाटन करण्यात आले. पहिल्यांदाच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले विधेयकही मंजूर करण्यात आले.

देशातील SC-ST साठी राखीव असलेल्या जागांपैकी 33 टक्के जागा महिलांसाठी राखीव असतील. काही लोकांसाठी महिला सक्षमीकरण हा निवडणूक जिंकण्याचा मुद्दा असू शकतो, पण माझ्या पक्षासाठी आणि माझे नेते मोदी यांच्यासाठी हा मुद्दा राजकारणाचा नसून मान्यतेचा मुद्दा आहे. मोदींनीच भाजपमध्ये पक्षीय पदांवर महिलांना 33 टक्के आरक्षण दिले. देशातील जनतेने सीएमनंतर पीएम मोदींना पंतप्रधान केले. 30 वर्षांनंतर त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे पूर्ण बहुमत असलेले सरकार स्थापन झाले. त्यावेळी पीएम मोदींनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्याचे स्पष्ट झाले होते. त्यावेळी मोदींच्या खात्यात जे काही पैसे होते, ते त्यांनी वर्ग 3 कर्मचारी आणि मुलींच्या खात्यात पाठवले होते.

आज जगभरात विमाने उडवणाऱ्या महिलांची संख्या 5% आहे. भारतात या महिलांची संख्या 15% आहे. हे महिला सक्षमीकरण आहे. शाह म्हणाले- ही घटनादुरुस्ती पहिल्यांदाच झालेली नाही. देवेगौडा ते मनमोहन जी यांच्यापर्यंत चार प्रयत्न झाले. सर्वप्रथम, 12 सप्टेंबर 1996 रोजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांच्या काळात याबाबत घटनादुरुस्ती करण्यात आली. यावेळी काँग्रेस विरोधी पक्षात होती. हे विधेयक सभागृहात ठेवल्यानंतर ते गीता मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला देण्यात आले, मात्र विधेयक सभागृहात पोहोचू शकले नाही. 11वी लोकसभा आली तेव्हा विधेयक रद्द झाले. यानंतर अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात 12 व्या लोकसभेत हे विधेयक आले, पण ते हटवण्यात आले. अटलजींच्या काळात 13व्या लोकसभेत हे विधेयक पुन्हा आले, पण कलम 107 अंतर्गत हे विधेयक हटवण्यात आले.यानंतर मनमोहन सिंग यांनी विधेयक आणले, मात्र ते विधेयक हटवण्यात आले. शहा म्हणाले की, कोणतेही जुने विधेयक जीवंत नाही. लोकसभा विसर्जित झाल्यावर प्रलंबित विधेयके रद्द होतात, असे त्यांनी सांगितले.

### दोन्ही बाजूचे सर्व खासदार भावूक

» काँग्रेसची मागणी आहे की हे विधेयक तातडीने लागू करावे. सरकारने परिसीमन होईपर्यंत थांबू नये. याआधी जात जनगणना करून या विधेयकात एससी-एसटी आणि ओबीसी महिलांना आरक्षण द्यावे. राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि सपा खासदार डिंपल यादव यांनीही विधेयकात ओबीसी महिलांना आरक्षण देण्याची मागणी केली. सुप्रिया म्हणाल्या की, सरकारने मनापासून विचार करून विधेयकात एससी, एसटी आणि ओबीसी महिलांसाठी आरक्षणाची तरतूद करावी. त्याचबरोबर सपा खासदार डिंपल यादव म्हणाल्या की, विधेयकात ओबीसी आणि अल्पसंख्याक महिलांनाही आरक्षण दिले पाहिजे. राजीव गांधींचे स्वप्न या विधेयकाच्या माध्यमातून पूर्ण होणार असल्याचे सोनिया गांधी म्हणाल्या. त्याचवेळी राष्ट्रवादीच्या सुप्रिया सुळे आणि सपाच्या डिंपल यादव यांनी ओबीसी महिलांनाही लाभ देण्याची वकिली केली.

# खासदारांना वाटलेल्या संविधानाच्या प्रतीवरून वाद!

## » प्रस्तावनेतून समाजवादी-धर्मनिरपेक्ष शब्द हटवले : काँग्रेस

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**संसदेत सुरू असलेल्या विशेष अधिवेशनादरम्यान नवा वाद निर्माण झाला आहे. नव्या संसदेच्या उद्घाटनावेळी खासदारांना वाटण्यात आलेल्या संविधानाच्या प्रतीमध्ये छापण्यात आलेल्या प्रस्तावनेतून 'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवादी' हे शब्द काढून टाकण्यात आल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.**

याला उत्तर देताना सरकारने म्हटले आहे की, राज्यघटनेच्या प्रतीमध्ये मूळ राज्यघटनेची प्रस्तावना समाविष्ट करण्यात आली आहे. ज्यात 'सेक्युलर' आणि 'सोशलिस्ट' हे शब्द नव्हते. वास्तविक, हे दोन्ही शब्द 1976 मध्ये 42व्या घटनादुरुस्तीद्वारे राज्यघटनेच्या प्रस्तावनेत समाविष्ट करण्यात आले होते. या वादाला कायदेशीर पैलूही आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या एका निर्णयात राज्यघटनेची प्रस्तावना संविधानाचा भाग म्हणून स्वीकारली आहे. अशा स्थितीत कोणताही शब्द काढायचा असेल किंवा समाविष्ट करायचा असेल तर दुसरी घटनादुरुस्ती करावी लागेल. काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी आरोप केला आहे की, 'आम्हाला माहिती आहे की हे शब्द 1976 मध्ये दुरुस्तीनंतर जोडण्यात आले होते, पण आज जर कोणी आम्हाला संविधान देत असेल आणि त्यात हे शब्द नाहीत तर ही चिंतेची बाब आहे.



' ते म्हणाले की, भाजपचा हेतू संशयास्पद आहे. हे अत्यंत हुशारीने केले आहे. ही माझ्यासाठी चिंतेची बाब आहे. मी हा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न केला, पण मला हा मुद्दा मांडण्याची संधी मिळाली नाही. अधीर रंजन यांच्या आरोपांवर कायदामंत्री अर्जुनराम मेघवाल म्हणाले, 'राज्यघटना अस्तित्वात आली तेव्हा समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष असे शब्द नव्हते. राज्यघटनेच्या 42व्या घटनादुरुस्तीत हे शब्द जोडण्यात आले आहेत. मात्र, खासदारांना देण्यात आलेल्या प्रतमध्ये मूळ प्रस्तावना आणि सुधारित प्रस्तावना या दोन्हींचा समावेश असल्याचे भास्करच्या तपासात समोर आले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या पानावर मूळ प्रस्तावना आहे, तर दुसऱ्या पानावर सुधारित प्रस्तावनाही आहे. अधीर रंजन यांचा दावा ठोस नाही कारण त्यांनी संपूर्ण सांगितले नाही. मात्र, जुनी प्रस्तावना का ठेवण्यात आली आहे, हेही स्पष्ट झालेले नाही. 18 सप्टेंबरपासून सुरू झालेल्या संसदेच्या विशेष अधिवेशनातील कामकाज 19 सप्टेंबरपासून सुरू झाले. त्याच दिवशी सर्व खासदारांना जुन्या इमारतीतून नवीन इमारतीत हलवण्यात आले. त्यानंतर संविधानाची ही प्रत खासदारांना देण्यात आली. महिला आरक्षण विधेयक (नारी शक्ती वंदन विधेयक) 19 सप्टेंबर रोजी नवीन संसदेच्या कामकाजाच्या पहिल्या दिवशी लोकसभेत सादर करण्यात आले. या विधेयकानुसार लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी 33 टक्के आरक्षण लागू केले जाईल. लोकसभेच्या 543 जागांपैकी 181 जागा महिलांसाठी राखीव असतील. हे आरक्षण 15 वर्षे टिकेल. यानंतर संसदेची इच्छा असल्यास ती मुदत वाढवू शकते.

### भाजपच्या हेतूवर शंका

» काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी आरोप केला आहे की, 'आम्हाला माहिती आहे की हे शब्द 1976 मध्ये दुरुस्तीनंतर जोडण्यात आले होते, पण आज जर कोणी आम्हाला संविधान देत असेल आणि त्यात हे शब्द नाहीत तर ही चिंतेची बाब आहे.' ते म्हणाले की, भाजपचा हेतू संशयास्पद आहे. हे अत्यंत हुशारीने केले आहे. ही माझ्यासाठी चिंतेची बाब आहे. मी हा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न केला, पण मला हा मुद्दा मांडण्याची संधी मिळाली नाही.

# अष्टविनायक दर्शन !



पहिला गणपती- मोरगांवचा श्री मयुरेश्वर



दुसरा गणपती - सिद्धटेकचा श्री सिद्धेश्वर



तिसरा गणपती - पालीचा श्री बल्लाळेश्वर



चौथा गणपती - महाडचा श्री वरदविनायक

अष्टविनायक हा शब्द ‘अष्ट’ आणि ‘विनायक’ या दोन शब्दांच्या संयोगातून तयार झाला आहे. अष्ट म्हणजे आठ आणि विनायक म्हणजे आपले लाडके दैवत गणपती. कोणतेही शुभ कार्य सुरू करण्यापूर्वी प्रथम गणपतीची पूजा केली जाते. कारण गणपतीबाप्पा चौदा विद्या ,चौसष्ट कलांचा अधिपती आहे आणि सर्व विघ्ने दूर करणारा गणपतीबाप्पा आपल्या मार्गातील सर्व अडथळे दूर करतो आणि समृद्धी देतो. ही मंदिरे प्रेक्षणीय स्थळांपैकी आहेत. या आठही मंदिरांची स्थापत्य रचना अतिशय उत्कृष्ट आणि मनाला आनंद देणारी आहे. वास्तविक पुण्याच्या जवळ विविध गावांत श्रीगणेशाची आठ मंदिरे आहेत, त्यांना अष्टविनायक म्हणतात. या मंदिरांना स्वयंभू मंदिरे असेही म्हणतात. स्वयंभू म्हणजे येथे भगवान श्रीगणेश स्वतः प्रकट झाले आहेत. म्हणजेच कोणीही त्यांची मूर्ती बनवून बसवली नाही. गणेश आणि मुद्गल पुराण यांसारख्या विविध पुराणांमध्येही या मंदिरांचा उल्लेख आढळतो. ही मंदिरे अतिशय प्राचीन असून त्यांना ऐतिहासिक महत्त्वही आहे. या मंदिरांच्या यात्रेला अष्टविनायक तीर्थयात्रा असेही म्हणतात. अष्टविनायक मंदिराच्या संदर्भात असे मानले जाते की तीर्थ गणेशाची ही आठ पवित्र मंदिरे स्वतःच उगम पावली आणि जागृत झाली.



स्वस्ति श्रीगणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदम् ॥१॥
बल्लाळं मुरुडे विनायकमहं चिन्तामणिं थेवरे ॥२॥
लेण्याद्रौ गिरिजात्मजं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरे ॥३॥
ग्रामे रांजणनामके गणपतिं कुर्यात् सदा मंगलम् ॥४॥



पाचवा गणपती - थेऊरचा श्री चिंतामणी



सहावा गणपती - लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मक



सातवा गणपती - ओझरचा श्री विघ्नेश्वर



आठवा गणपती - रांजणगांवचा श्री महागणपती

# भारत आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी सज्ज!

## » सुवर्णपदक जिंकण्याचे कोण आहेत आघाडीचे दावेदार?

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था



**२३ सप्टेंबरपासून चीनमध्ये आशियाई क्रीडा स्पर्धा सुरू होत आहेत. हांगझाऊ येथे होणाऱ्या खेळांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ६५६ खेळाडू सज्ज झाले आहेत. यावेळी भारताचा हा सर्वात मोठा चमू देशाचे प्रतिनिधित्व करणार आहे. अशा स्थितीत भारतीय खेळाडूंकडूनही प्रभावी कामगिरीची अपेक्षा आहे. भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्रा, मीराबाई चानू, येथील बजरंग पुनिया हांगझाओ येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत या खेळाडूंकडून देशाला पदकांची अपेक्षा आहे.**

जेव्हा आपण पदकाच्या दावेदारांबद्दल बोलतो तेव्हा आपल्या मनात सर्वात पहिले नाव येते ते म्हणजे नीरज चोप्रा. स्पर्धकांच्या यादीत नीरज पहिल्या क्रमांकावर आहे. टोकियो ऑलिम्पिकमध्ये देशाला सुवर्णपदक मिळवून देणारा नीरज आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. या २५ वर्षीय खेळाडूने या मोसमात आतापर्यंत भालाफेकमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. नीरजने डायमंड लीगमध्ये ८८.६७ मीटर आणि ८७.६६ मीटर फेक केले होते. त्याचबरोबर त्याने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत ८८.१७ मीटर फेक करून सुवर्णपदक जिंकले. वेटलिफ्टर मीराबाई चानू ही आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेत भाग घेणाऱ्या दोन भारतीय वेटलिफ्टर्सपैकी एक आहे. टोकियो ऑलिम्पिकची रौप्यपदक विजेती चानू ४९ किलो वजनी गटात सहभागी होणार आहे. २९ वर्षीय खेळाडूचे थेट लक्ष्य सुवर्णपदकावर असेल. तिने असे केल्यास या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी ती भारताची पहिली वेटलिफ्टर ठरेल. मीराबाईने नुकतीच जागतिक स्पर्धाही जिंकली आहे. त्याचबरोबर आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदक हे तिच्या कारकिर्दीतील एकमेव पदक आहे जे तिला आतापर्यंत मिळवता आलेले नाही. पोडियममध्ये अव्वल स्थान मिळविण्यासाठी तिला चीनच्या जियांग हुइहुआकडून कडव्या स्पर्धेला सामोरे जावे लागेल. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या शेवटच्या मोसमात कुस्तीत सुवर्णपदक जिंकणारा बजरंग पुनिया हा एकमेव भारताचा कुस्तीपटू होता. बजरंगने टोकियो ऑलिम्पिकमध्येही कांस्यपदक जिंकले होते. यानंतर आता हांगझाऊ येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आपली कामगिरी कायम राखण्याचे त्याचे लक्ष्य असेल. तसेच, राष्ट्रकुल स्पर्धेत सलग दोन पदके जिंकणाऱ्या या कुस्तीपटूच्या नजरा चीनच्या सुवर्णपदकावरही असतील. भारताचा रवी दहिया आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरू शकला नव्हता. अशा परिस्थितीत देशाच्या नजरा फक्त २९ वर्षीय कुस्तीपटू बजरंगवर खिळल्या आहेत. बजरंगला या खेळांच्या चाचण्यांमधूनही सूट देण्यात आली होती. २७ वर्षीय निखत जरीन आशियाई क्रीडा स्पर्धेत पदार्पण करणार आहे. गेल्या दोन वर्षांत निखत हा भारताचा सर्वोत्तम बॉक्सर म्हणून उदयास आली आहे. २०२२ च्या वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये चॅम्पियन बनून तिने शानदार कामगिरी केली होती आणि त्यावेळी तिची बरीच चर्चा झाली होती.

### पुरुष संघाचे वेळापत्रक

» बॅडमिंटनपटू एच.एस. प्रणॉय सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. ३० वर्षीय बॅडमिंटनपटूने त्याच्या बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशन कपमध्ये (BWF) उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याच्या क्रमवारीत लक्षणीय सुधारणा केली आहे. वर्षाच्या सुरुवातीला प्रणॉयने मलेशियन मास्टर्सचे विजेतेपद पटकावले आणि ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये तो उपविजेता ठरला. त्याच वेळी, एच.एस. प्रणॉयने २०२३च्या वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक देखील जिंकले. जर आशियाई क्रीडा स्पर्धेतील बॅडमिंटनकडे पाहिले तर हा एक असा खेळ आहे ज्यात भारत सुवर्णपदक जिंकण्यात अपयशी ठरला आहे. अशा स्थितीत शटलर प्रणॉयचा फॉर्म पाहता, यावेळी आशियाई क्रीडा स्पर्धेत पदकावर तो आपले नाव कोरण्यासाठी सज्ज झाला आहे.

# वर्ल्डकपमध्ये 70 मीटरची असेल बाउंड्री!

## » क्युरेटर्सना खेळपट्ट्यांवर अधिक गवत ठेवण्यास सांगितले

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) 5 ऑक्टोबरपासून भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेसाठी अनेक ठिकाणच्या क्युरेटर्ससाठी 'प्रोटोकॉल' तयार केला आहे, कारण ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये भारतात अनेक भागांमध्ये दव असते. नाणेफेकीची भूमिका महत्त्वाची ठरते. नाणेफेकीची भूमिका काही प्रमाणात प्रभावी व्हावी यासाठी आयसीसीने हे पाऊल उचलले आहे.**

भारतीय खेळपट्ट्या सामान्यतः फिरकीसाठी अधिक अनुकूल असतात, परंतु आयसीसीने क्युरेटर्सना खेळपट्ट्यांवर अधिक गवत सोडण्यास सांगितले आहे, जेणेकरून वेगवान गोलंदाजही सामन्यात टिकून राहू शकतील. याचा अर्थ प्लेइंग-11 संघांमध्ये आणखी वेगवान गोलंदाजांना संधी मिळू शकते. 2021 मध्ये UAE मध्ये होणाऱ्या T20 विश्वचषकावरही दव पडल्याने त्याचा चांगलाच परिणाम झाला आणि दुसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या संघाला त्याचा खूप फायदा झाला. एका सूत्राने सांगितले की, 'वर्षाच्या या वेळी उत्तर, पश्चिम आणि पूर्वेकडील राज्यांमध्ये प्रचंड दव पडेल. चेन्नई आणि बंगळुरूमध्ये होणाऱ्या सामन्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. दव पडल्याचा फिरकीपटूंच्या कामगिरीवर मोठा प्रभाव पडतो, त्यामुळे अधिक गवत असल्याने खेळपट्टीवर संघांना फिरकीपटूंवर जास्त अवलंबून राहावे लागणार नाही. संतुलन राखण्यासाठी आयसीसीने प्रत्येक क्षेत्राची सीमा वाढवण्याचे आदेश दिले आहेत.



सर्व स्टेडियमच्या क्युरेटर्सना सांगण्यात आले आहे की सीमेचा आकार 70 मीटर असावा. आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये, सीमारेषेचा किमान आकार 65 मीटर असतो तर कमाल आकार 85 मीटर असतो. जुन्या स्टेडियममध्ये सीमारेषेचा आकार 70 ते 75 मीटरच्या दरम्यान होता, मात्र आता सीमारेषा 70 मीटरपेक्षा जास्त असावी लागेल. बीसीसीआयचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी महिनाभरापूर्वी आशिया चषकासाठी संघाची घोषणा करताना दव घटकाची कबुली दिली होती. विश्वचषक 2023 चे सामने 10 शहरांमध्ये खेळवले जातील. अहमदाबाद (नरेंद्र मोदी स्टेडियम), बेंगळुरू (एम चिन्नास्वामी स्टेडियम), चेन्नई (एमए चिदंबरम स्टेडियम), दिल्ली (अरुण जेटली क्रिकेट स्टेडियम), धर्मशाला (हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियम), हैदराबाद (राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, उप्पल) . याशिवाय कोलकाता (ईडन गार्डन), लखनऊ (अटल बिहारी बाजपेयी एकना क्रिकेट स्टेडियम), मुंबई (वानखेडे स्टेडियम), पुणे (महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियम). हैदराबाद व्यतिरिक्त, गुवाहाटी आणि तिरुअनंतपुरममध्ये 29 सप्टेंबर ते 3 ऑक्टोबरदरम्यान सराव सामने होणार आहेत.

### भारतीय खेळपट्ट्या फिरकीसाठी अनुकूल

» भारतीय खेळपट्ट्या सामान्यतः फिरकीसाठी अधिक अनुकूल असतात, परंतु आयसीसीने क्युरेटर्सना खेळपट्ट्यांवर अधिक गवत सोडण्यास सांगितले आहे, जेणेकरून वेगवान गोलंदाजही सामन्यात टिकून राहू शकतील. याचा अर्थ प्लेइंग-11 संघांमध्ये आणखी वेगवान गोलंदाजांना संधी मिळू शकते. 2021 मध्ये UAE मध्ये होणाऱ्या T20 विश्वचषकावरही दव पडल्याने त्याचा चांगलाच परिणाम झाला आणि दुसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या संघाला त्याचा खूप फायदा झाला. 'वर्षाच्या या वेळी उत्तर, पश्चिम आणि पूर्वेकडील राज्यांमध्ये प्रचंड दव पडेल.